अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 16 एप्रिल 2026 | वर्ष 11 वे | अंक 35 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# सामाजिक ऋणातून फुलले मनिषाचे दाम्पत्य जीवन

## ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या अध्यक्ष व नगरसेवकांचा मनिषाच्या विवाहाकरीता मदतीचा हात

ब्रह्मपुरी/महेश पिलारे

'समाज आपला आहे आणि आपण समाजाचे काही देणे लागतो,' या उक्तीचा प्रत्यय नुकताच ब्रह्मपुरीत पाहायला मिळाला. आई-वडिलांचे छत्र हरवलेल्या एका अनाथ मुलीच्या विवाहासाठी ब्रह्मपुरी नगर परिषदेच्या नगराध्यक्षांपासून तर सर्व नगरसेवकांनी पक्षभेद विसरून मदतीचा हात पुढे केला. लोकप्रतिनिधींच्या या संवेदनशील पुढाकारामुळे मनिषा नावाच्या अनाथ तरुणीचा विवाह सोहळा



निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी मोलाचे योगदान मिळालं आहे.

ब्रह्मपुरीतील धुम्मनखेडा येथील रहिवासी मनिषा प्रकाश भोयर ही तरुणी अनाथ असून तिच्या पश्चात दोन धाकट्या बहिणी आहेत. आई-वडिलांच्या निधनानंतर तिन्ही बहिणींनी मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवला. मनिषाचे लग्न जुळले खरे, मात्र पदरी असलेल्या गरिबीमुळे लग्नाचा खर्च कसा उचलावा, हा मोठा यक्षप्रश्न बहिणींसमोर होता. मनिषाच्या लग्नाची अडचण लक्षात येताच नगरसेविका रंजना गिरीश बुराडे आणि नगरसेविका बबीता किशोर आमले यांनी पुढाकार घेतला. त्यांनी आपल्या सहकारी नगरसेवकांना मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत नगराध्यक्ष योगेश मिसार व उपाध्यक्ष नितीन उराडे यांच्या मार्गदर्शनात सर्व नगरसेवक या कार्यात हिरीरीने सहभागी झाले. यामध्ये राकेश पडोळे, प्रकाश खोब्रागडे, चंद्रकांत बावनकुळे, मोंटू पिलारे, मनोज कावळे, अनुकूलजी शेंडे, सतीश हुमणे, सचिन राऊत, स्वीकृत सदस्य वकार खान, पुष्पाकर बांगरे यांनी सढळ हाताने मदत केली. केवळ पुरुष नगरसेवकच नव्हे, तर महिला नगरसेविकांनीही या कार्यात मोठी भूमिका बजावली. काजल तलमले, माधुरी उपासे, रेणू ठेंगरी, सपना बल्लारपुरे, रंजना पिसे, ज्योती राऊत, गीता मेश्राम आणि जयश्री कुथे,

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# ब्रम्हपुरीचा पारा ४२ अंशाच्या पार, दुपारी रस्ते ओस

## उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण; प्रशासनाकडून दुपारी घराबाहेर न पडण्याचे आवाहन

ब्रम्हपुरी /का.प्र.

विदर्भातील उष्णतेची लाट आता अधिक तीव्र होऊ लागली असून, ब्रम्हपुरी शहरासह संपूर्ण तालुक्यात उन्हाचा कडाका वाढला आहे. बुधवारी ब्रम्हपुरीचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पार गेल्याने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. सकाळच्या १० वाजेपासूनच सूर्याची दाहकता जाणवू लागल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

नेहमी गजबजलेल्या




ब्रम्हपुरी शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ आणि तहसील कार्यालय परिसर दुपारी १२ ते ४ या वेळेत अक्षरश: ओस पडलेला पाहायला मिळत आहे. कडक उन्हामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले असून, अत्यावश्यक कामाशिवाय कोणीही बाहेर पडत नसल्याने रस्त्यांवर शुकशुकाट पसरला आहे. विशेषत: दुचाकीस्वारांना उष्ण हवेच्या झळांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.शरीराची लाहीलाही होत असल्याने नागरिक थंडावा शोधण्यासाठी शीतपेयांकडे वळत

(उर्वरित पान क्र. ६ वर)




# धानाचे 'बोनस' व 'उद्दिष्ट' वाढवा

## भारत-अमेरिका शेती करार रद्द करा

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील धान खरेदीचे उद्दिष्ट संपल्याने मागील ३-४ महिन्यांपासून हजारो क्विंटल धानाची 'बिलिंग' प्रक्रिया रखडली असून, शेतकऱ्यांचे चुकारे अद्याप मिळालेले नाहीत. या गंभीर प्रश्नावर शासनाने येत्या ४ ते ५ दिवसांत धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून द्या, प्रति क्विंटल १००० रुपये बोनस जाहीर करा, तसेच ९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्र सरकारने पारित करून



शेतकऱ्यांवर अन्याय करणारा भारत अमेरिका शेती करार रद्द करा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेचे जिल्हा सचिव

(उर्वरित पान क्र. ६ वर)

संपादकीय...

# आमुलाग्र सुधारणा हव्यात

भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या तावडीतून मुक्त असलेली घटनात्मक संस्था आता क्वचितच कुठे उरली असेल. तरीही क्वचित कुठे या संस्थांमधून व्यवस्थेत सुधारणा करण्याचे संकल्प केले जातात, तेव्हा साहजिकच परिवर्तन होण्याच्या आशेला पालवी फुटते. प्रदीर्घ काळापासून देशाच्या न्यायव्यवस्थेवर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत. कनिष्ठ न्यायालयांवर असे आरोप सर्रास होत असतात. गेल्या काही वर्षांत वरच्या न्यायालयातही अशी प्रकरणे समोर आल्याने न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

दिल्लीतील घरातून जप्त झालेल्या जळालेल्या नोटांच्या प्रकरणात अडकलेले अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना उशिरा का होईना अखेर राजीनामा देण्यास भाग पाडले गेले. हे उशिराने सुचलेले शहाणपण म्हणण्यास बराच वाव आहे. न्यायाधीशांच्या निवासस्थानी, विशेषतः आगीनंतर पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चलनी नोटा सापडणे हे न्यायाधीशांकडून अपेक्षित असलेल्या नैतिकता आणि सचोटीवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करते. गतवर्षी होळीच्या दिवशी दिल्लीतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी आग लागल्यानंतर जळालेल्या चलनी नोटांचे गठे सापडल्याने देशाला धक्का बसला होता. त्यानंतर झालेली चौकशी, बदली आणि न्यायिक कामातून माघार या सर्वांमधून या प्रकरणाचे गांभीर्य दिसून येते. दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात झालेल्या बदलीमुळेही अनेक प्रश्न निर्माण झाले. हा एक तात्पुरता उपाय होता की खऱ्या परिणामांपासून वाचण्याचा मार्ग?

न्यायव्यवस्था ही भारतीय लोकशाहीचा सर्वात विश्वासार्ह आधारस्तंभ मानली जाते. मात्र जेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखालील चौकशीनंतरही असे आरोप होतात तेव्हा त्याबाबत जनतेमध्ये अविश्वास निर्माण होणे स्वाभाविक आहे. न्याय केवळ झालाच पाहिजे असे नाही तर तो होताना दिसलाही पाहिजे. हे प्रकरण याच मूलभूत तत्त्वाला आव्हान देते. सर्वात महत्त्वाचा प्रश्न उत्तरदायित्वाचा आहे. घटनात्मक पद भूषवणाऱ्या व्यक्तीसाठी राजीनामा ही पुरेशी शिक्षा आहे का? त्यानंतर फौजदारी तपास आणि खटला चालवला पाहिजे का? संसदेत महाभियोगाची प्रक्रिया अस्तित्वात असली तरी तिची गुंतागुंत आणि लांबी यामुळे ती अनेकदा निष्प्रभ ठरते. हेही उल्लेखनीय आहे की, न्यायमूर्ती वर्मा यांनी या आरोपांना एक कारस्थान म्हटले होते, तर सर्वोच्च न्यायालयाच्या समितीच्या तपासाने त्यांना निर्दोष ठरवले. अशा परस्परविरोधी भूमिकांच्या पार्श्वभूमीवर, पारदर्शकता आणि निष्पक्षतेची मागणी तीव्र होत आहे. या प्रकरणाचा संपूर्ण तपास अहवाल सार्वजनिक केला पाहिजे का? खरे हेतू काय आहेत हे जाणून घेण्याचा जनतेला अधिकार नाही का? या संपूर्ण घटनेने न्यायपालिकेतील अंतर्गत व्यवस्थेबद्दल महत्त्वपूर्ण प्रश्न निर्माण केले आहेत. ही व्यवस्था स्वतःच्या अंतर्गत अनियमितता निष्पक्षपणे उघडकीस आणण्यास सक्षम आहे का, की तिला बाह्य देखरेखीची गरज आहे? हे सवाल केवळ या मुद्द्यांवर भाष्य करण्यासाठी नाही, तर त्यांना सामोरे जाण्यासाठी आहेत.

देशातील न्यायपालिकेची नैतिक विश्वासार्हता तिच्या सामर्थ्यावर आजवर टिकून आहे. हा पायाच कमकुवत झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण जनतेवर होतो. त्यामुळे हे प्रकरण केवळ एक दुर्दैवी घटना म्हणून सोडून देता येणार नाही. या घटनेकडे एक इशारा म्हणून गांभीर्याने पाहिले पाहिजे. आता न्यायव्यवस्थेत आमूलाग्र सुधारणांची गरज आहे. न्यायाधीशांसाठीची आचारसंहिता अधिक कडक केली पाहिजे, नियुक्ती आणि देखरेख प्रणाली अधिक पारदर्शक केली पाहिजे आणि आरोप सिद्ध झाल्यावर त्वरित आणि कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य तिच्या उत्तरदायित्वाइतकेच महत्त्वाचे आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी राजीनामा दिल्याने विरोधी पक्षाचा विजय झाला आहे. मात्र राजीनामा हा शेवट नसून न्यायव्यवस्था अधिक पारदर्शक, उत्तरदायी आणि न्यायपूर्ण बनवणाऱ्या सुधारणांची सुरुवात असायला हवी. लोकशाहीतील न्यायाचे मंदिर जर अशाच प्रकारे कार्यक्षम राहिले तरच ते अधिक मजबूत होईल. लोकशाहीत लोकांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास टिकून राहणे अत्यंत आवश्यक आहे.

# ने.हि. ग्रंथालयशास्त्र विभागातर्फे भव्य ग्रंथप्रदर्शनी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयामध्ये ग्रंथालयशास्त्र विभाग आयोजित डॉ. बाबासाहेब



आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दि. ०८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ च्या निमित्याने महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर, ग्रंथालयशास्त्र सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. युवराज मेश्राम, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. रेखा मेश्राम, डॉ. वर्षा चंदनशिवे, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. मिलिंद पठाडे, जितु मंडपे, सौरभ जयस्वाल आदि मान्यवर उपस्थित होते.

या ग्रंथ प्रदर्शनीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या संशोधनात्मक दुर्मिळ ग्रंथ, आत्मचरित्र, भारतीय राज्यघटना तसेच महापुरुषांच्या विविध पैलूंचे संशोधनात्मक पुस्तके यांचा समावेश आहे. तरी महाविद्यालयातर्फे आयोजित ग्रंथालयशास्त्र विभागातील पुस्तकांचा विद्यार्थी, शिक्षक तसेच ब्रम्हपुरी शहरातील वाचकांनी या ग्रंथप्रदर्शनीचा फायदा घ्यावा असे ग्रंथालयशास्त्र विभागातर्फे आवाहन करण्यात आले.

या ग्रंथप्रदर्शनीच्या यशस्वी आयोजनाकरिता प्रभारी ग्रंथपाल कु. सुषमा राऊत, विनय भागडकर, माणिक दुपारे, अनिल निनावे, शशिकांत माडे, श्रीमती सुनंदा घोडमारे या ग्रंथालयशास्त्रातील कर्मचाऱ्यानी अथक परिश्रम घेतले.

**वाचाल तर वाचाल..**

# भांडी घासणाऱ्या माऊलीची लेक झाली खाकी वर्दीची मानकरी

## ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनतर्फे कावेरी तुपटचा गौरव



ब्रह्मपुरी / का. प्र. :

परिस्थिती कितीही हलाखीची असली तरी, जर मनाशी जिद्द आणि परिश्रमाची तयारी असेल, तर यश नक्कीच मिळते, हे ब्रह्मपुरीतील एका लेकीने सिद्ध करून दाखवले आहे. हनुमान नगर, ब्रह्मपुरी येथील कुमारी कावेरी प्रमोद तुपट हिची चंद्रपूर जिल्हा पोलीस दलात निवड झाली असून, तिच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल नुकताच ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन येथे तिचा जंगी सत्कार करण्यात आला.

कावेरीचा इथपर्यंतचा प्रवास अत्यंत खडतर होता. वडिलांनी दुसरे लग्न केल्यानंतर कावेरीची आई, उषा प्रमोद तुपट यांनी संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. स्वतःच्या पतीची साथ सुटलेली असतानाही खचून न जाता, त्यांनी लोकांच्या घरी भांडी घासून आणि मजुरी करून आपल्या मुलीला वाढवले. गरिबीशी दोन हात करत त्यांनी कावेरीचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आणि तिला पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण मिळवून दिले. आईचे कष्ट आणि कावेरीची चिकाटी आज फळाला आली असून, तिने पोलीस दलात मानाचे स्थान मिळवले आहे.

कावेरीच्या या प्रेरणादायी प्रवासाची दखल घेत ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन येथे पोलीस पाटील आणि शांतता कमिटीच्या बैठकीत तिचा विशेष सत्कार करण्यात आला. पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस उपनिरीक्षक बालाजी चव्हाण आणि पोलीस हवालदार अरुण पिसे यांच्या हस्ते कावेरीला शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले म्हणाले की, 'कावेरीने मिळवलेले यश हे केवळ तिचे यश नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करू इच्छिणाऱ्या प्रत्येक तरुणीसाठी एक आदर्श आहे. अशा प्रकारच्या सत्कार सोहळयांमुळे ग्रामीण भागातील तरुणांना पोलीस दलात भरती होण्यासाठी एक मोठे व्यासपीठ आणि प्रेरणा मिळेल.'

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस हवालदार अरुण पिसे यांनी केले. कार्यक्रमाला पोलीस पाटील तालुका संघटनेचे अध्यक्ष निलेश भोयर, सचिव वीरदर्जी देशमुख, सदस्य चंद्रशेखर कोसलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## विनोदिनी

एक बार कचहरी में एक गवाह बहुत लम्बे लम्बे बयान दे रहा था।
सरकारी वकील नाराज हो गया और गवाह से बोला- इतना अधिक बोलने की जरूरत नहीं है। तुमसे जो पूछा जाय उसका जवाब केवल हां या ना में ही दो।
गवाह : हुजूर हर सवाल का जवाब हां या ना में नहीं दिया जा सकता।
वकील : बिलकुल दिया जा सकता है, तुम मुझसे कोई भी सवाल पूछो मैं हां या ना में जवाब देकर दिखाता हूं।
गवाह : ठीक है हुजूर आपकी जिद पर मैं आपसे एक सवाल पूछता हूं, आप सिर्फ हां या ना में ही जवाब दीजियेगा।
वकील : पूछो।
गवाह : आपकी बीबी ने आपको पीटना छोड़ दिया या नहीं ??? बेचारे वकील बाबू अब तक सोच रहें हैं जवाब दे तो क्या दें....

# भाजप व रिपब्लिकन मित्र परिवारतर्फे जयंती बॅनर अनावरणातून सामाजिक संदेश

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ११ एप्रिलला थोर समाज सुधारक शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून नुकतेच ब्रह्मपुरी शहरातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात जाण्यासाठी असलेल्या महामार्गावरील प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौक या मुख्य चौकात क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन पटावरील आधारित भव्य होल्डिंग



अनावरण भारतीय जनता पक्ष व रिपब्लिकन मित्रपरिवार ब्रह्मपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर, उद्घाटक म्हणून रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा पत्रकार जीवनजी बागडे तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगरसेवक मनोज वठे, दीपकभाऊ उराडे, विलास विखार माजी बांधकाम सभापती, प्रा. प्रकाश बगमारे ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव, वर्षाताई चौधरी महिला शहर आघाडी अध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष रश्मीताई पेशणे, नगरसेवक तथा महामंत्री मनोज भूपाल, आरपीआय आठवले गटाचे नेते संतोष रामटेके, आरपीआय गवई गटाचे नेते विजय रामटेके , रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे शहराध्यक्ष पत्रकार प्रशांत डांगे यांची प्रामुख्याने विचार पिठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानवांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून तसेच दीप प्रज्वलित करून विनम्र अभिवादन करण्यात आले. ब्रह्मपुरी शहरात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आगळावेगळा नाविन्यपूर्ण असा अनोखा कार्यक्रम थाटामाटात डिजीटल युगात रोषणाई फटाक्यांची आतिषबाजी उत्साहात भव्य होर्डींग चे उद्घाटन करून साजरा करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक खोरिपा चे तालुका सरचिटणीस पद्माकर रामटेके यांनी केले तर आभार प्रदर्शन भाजपचे नगरसेवक तथा नगर महामंत्री मनोज भुपाल यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सहभागी होऊन नागरिकांनी महामानवास विनम्र अभिवादन केले.

# शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे माध्यम - डॉ. मिलिंद पठाडे



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे दि. ८ एप्रिल २०२६ रोजी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा'चा आज शुभारंभ करण्यात आला. या सामाजिक समता सप्ताहाचे पहिले पुष्प वक्ते इंग्रजी विषयाचे प्रा. मिलिंद पठाडे यांनी गुंफले.

'शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे माध्यम असून समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणातून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस नेणे, अधिकाधिक गरजेचे आहे.' असे विचार सांगून त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांचा आढावा घेतला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांनी देखील विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. 'विद्यार्थ्यांनी वाचनालयातील विविध ग्रंथाचे वाचन करून त्यातील ज्ञानाचा जीवनात वापर करावा,' असा विद्यार्थ्यांना त्यांनी मोलाचा सल्ला दिला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे संचालन डॉ. पद्माकर वानखडे तर डॉ. युवराज मेश्राम यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. रेखा मेश्राम, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.वर्षा चंदनशिवे, डॉ. अभिमन्यू पवार यांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# पोलीस दलात निवड झालेल्या मुलींचा भाकप तर्फे सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील आवळगाव, हळदा येथील पोलिस दलात निवड झालेल्या मुलींचा रविवारी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे वतीने सत्कार करण्यात आला. हळदा येथील कु. प्राची श्रीराम नरुले व योगिता दादाजी बावणे आणि आवळगाव येथील कु. शिवानी भास्कर गुरुनुले या तीन मुलींची नुकतीच चंद्रपूर पोलिस दलात निवड झाली. निवड झालेल्या या मुलींचा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉ.विनोद झोडगे पाटील यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.



अतिशय प्रतिकूल परिस्थितीत या ध्येयवेड्या गरीब कुटुंबातील मुलींनी यशाला गवसणी घालून समाजापुढे आदर्श निर्माण केला.त्यांच्या या यशातून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन यश प्राप्त करावे, असे आवाहन कॉम्रेड विनोद झोडगे यांनी केले. तसेच या तिन्ही जिद्दी मुलींना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच नरेश नखाते, शरद ठाकरे, संजय लोणारे, तंटामुक्ती अध्यक्ष लुमदेव खेवले, केशव बानबले, कैलास राऊत, सुरेश नखाते, मुखरु झोडगे, पत्रू मेश्राम, सूरेश पाटील ठाकरे, यादव मुलकर, यशवंत राऊत, धनराज उरकुडे, बाजीराव चिमूरकर, मधुकर राऊत, प्रवीण इटनकर, येमाजी भोपये, स्वप्नील चिमूरकर, गोविंदा चापले, सुनील चिमुरकर, विजय भोयर, भास्कर गुरुनुले, दीपक मुंगूने, हेमंत गुरुनुले, रेखा खरवडे, रेखा गुरुनुले यासह अन्य भाकपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# उष्माघाताच्या औषधाचे वितरण सुरु

ब्रम्हपुरी/का.प्र.

एप्रिल / मे महिन्यात कडक ऊन तापते. ऊन व त्यापासून होणाऱ्या त्रासाकरीता जसे तिव्र ताप, डोकेदुखी, लघवीत आग होणे, डोळ्यामध्ये आग, कमजोरी अशा प्रकारची लक्षणे तिव्र स्वरुपात आढळून येतात. यापासून आपले रक्षण व्हावे यादृष्टीने ब्रम्हपुरी शहरातील प्रसिध्द होमिओतज्ञ डॉ. विलास गजपूरे, रेणुका माता चौक ब्रम्हपुरी यांच्या तर्फे होमिओपॅथीचे जनक डॉ. हॅनिमन यांचे जयंती प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा १० एप्रिल ते १० जूनपर्यंत दररोज होमिओपॅथीक औषधाचे (ग्लोविटा गोळ्या)वितरण केल्या जात आहे. इच्छुकांनी दररोज सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत लाभ घेण्याचे डॉ.विलास गजपूरे यांनी कळविले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्य समता रॅली संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बाईक व कार रॅली काढण्यात आली.



ब्रम्हपुरी नगरपरिषद क्षेत्रातील नगरपरिषद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, त्रिरत्न बुध्द विहार, सम्राट अशोक चौक, गुजरी वार्ड, पेठवार्ड, देलनवाडी, धम्मभूमी, बोंडेगाव येथील बुध्द विहारांना भेट देत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना रॅलीद्वारा समितीचे अध्यक्ष व रिपाई नेते अशोक रामटेके यांचे नेतृत्वात अभिवादन करण्यात आले. रॅलीत बहुसंख्येने महिला व पुरुष भीमसैनिक उपस्थित होते. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष अशोक रामटेके यांचेकडून त्रिरत्न बुध्द विहारात सुरू असलेल्या अभ्यासिकेला ५००० रूपयांचा धनादेश व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले समग्र वाङमय हा ग्रंथ भेट देण्यात आला. रॅलीचा समारोप पंचशील एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात करण्यात आला.

# मद्यधुंद स्कॉर्पियो चालकाने पोलीसाला उडवले

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्त्यावरील बेशिस्त आणि मद्यधुंद वाहनचालकांमुळे निष्पाप जीवांना अपघाताचा फटका बसण्याचे सत्र सुरूच आहे. ब्रम्हपुरी ते आरमोरी मार्गावरील वैनगंगा नदीच्या पुलावर एका मद्यधुंद स्कॉर्पिओ चालकाने पोलीस हवालदाराच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पोलीस हवालदार गंभीर जखमी झाले असून, धडक दिल्यानंतर आरोपी चालक घटनास्थळावरून पसार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले पोलीस हवालदार कृनाल भाऊराव हेमके (वय ४५ वर्ष ) हे रविवारी, १२ एप्रिल रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास आपल्या दुचाकीने (MH 33 Z 1776) आरमोरीकडे जात होते. ते वैनगंगा नदीच्या पुलावर पोहोचले असता, समोरून येणाऱ्या एका पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओने (MH 34 KR 7982) त्यांना जोरदार धडक दिली. प्रत्यक्षदर्शी आणि फिर्यादीनुसार, स्कॉर्पिओ चालक दारूच्या नशेत होता. तो आपले वाहन अत्यंत भरधाव वेगाने आणि नागमोडी (वाकडे-तिकडे) चालवत होता. या निष्काळजीपणामुळेच त्याने हवालदार हेमके यांच्या दुचाकीला समोरून धडक मारली. या धडकेत हेमके यांच्या शरीराला गंभीर इजा झाली असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

याप्रकरणी जखमी हवालदाराच्या पत्नी भावना कृनाल हेमके यांनी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी स्कॉर्पिओ चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २८१, १२५(ब), मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४, १८५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे पोलीस दलात आणि ब्रम्हपुरी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मद्यधुंद चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून आता जोर धरत आहे.

# ब्रम्हपुरी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची सभा संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ तालुका शाखा ब्रह्मपुरी ची वार्षिक सर्वसाधारण सभा स्वागत मंगल कार्यालयात पार पडली. या सभेचेउद्घाटक म्हणून गटविकास अधिकारी रवींद्र घुबडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे सिंदेवाही तालुक्याचे सचिव मेंडुलकर सर होते. प्रमुख अतिथी म्हणून महादेव ठाकरे, अशोक वैद्य, प्रभाकर भालतलक, संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लांजेवार, संघटनेचे सचिव विजय वाकडे, जिल्हा कोषाध्यक्ष राजेश्वर सहारे, के. डी.रासेकर, विजय नरुले, डॉ. मंजुषा साखरकर, शकुंतला कोडपे, राजू भागवत उपस्थित होते.

सर्वसाधारण सभेत वयाची ७०, ८० व ९० वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा सहपत्नीक भेटवस्तू देऊ सत्कार करण्यात आला. सभेत मासिक वर्षाचे अहवाल वाचन व जमा खर्च संघटनेचे सचिव विजय वाकडे यांनी सादर केले. सभेला आनंदकर खेत्रे, यशवंत कांबळी, दादाजी राऊत, यशवंत तलमले, प्रमोद ढोरे, श्रीहरी बनसोड, लता निनावे, नामदेव बगमारे, अशोक शामकुळे, अनिल वाळके, मनोहर कोरानकर, रमेश जांभुळकर, जगदीश मेश्राम, विनायक शेंडे, जयगुरु मेश्राम, सुधाकर पोपटे, यशवंत टेंभुर्णे, गंगाधर भोयर, रामभाऊ नरड, सुनील पिल्लेवान, रवींद्र तोंडरे, राजू राखडे, चंद्रशेखर मेश्राम, अरविंद साखरकर, संजय वाळके, संजय मेश्राम, आनंदराव भोयर, गौतम वावरे, संजय भोसारे, संघरक्षक डांगे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश लांजेवार, संचालन प्रेमदास डांगे तर आभार प्रदर्शन रवींद्र पिलारे यांनी केले.

# विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. स्निग्धा कांबळे तर सचिव पदी डॉ. रविंद्र विखार

ब्रह्मपुरी/का.प्र.






विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय सावली येथे दिनांक ७ एप्रिल २०२६ ला पार पडले. यात विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेची नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली असून यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रह्मपुरी येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.स्निग्धा राजेश कांबळे यांची अध्यक्षपदी तर श्री गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रवींद्र विठोबा विखार यांची सचिव पदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

परिषदेच्या उपाध्यक्ष पदी डॉ. संजय चव्हाण, सहसचिव पदी डॉ. पितांबर पिसे, डॉ.गजेंद्र कढव यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सदस्य म्हणून डॉ.दिलीप रामटेके चंद्रपूर , प्रा. बालाजी दमकोंडावार ब्रह्मपुरी, डॉ. धर्मदास घोडेस्वार पोंभुर्णा, डॉ.रणधीर साठे चंद्रपूर, डॉ. मंदाकिनी निहिते नवरगाव, डॉ.दिवाकर उराडे सावली, रमेश काळबांडे इ.ची बिनविरोध निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून डॉ.बी.एम. कराडे, डॉ. अशोक सालोटकर यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार
वाचा या लिंक वर...
www.bramhapuri
samachar.com/bs

# ब्रम्हपुरी परिसरात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



ब्रम्हपुरी/का.प्र.

**शिवाजीनगर, खेड :** भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक, भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते, सत्यशोधक समाजाचे संस्थापक, समाजातील शोषित, वंचित व दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी अविरत कार्य करतांना समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरांविरुद्ध प्रखरपणे लढा देणारे , शेतकरी व कष्टकरी कामगार यांना न्याय देऊन त्याना प्रतीष मिळवून देणारे थोर समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम प्राचार्य डॉ. एन. एस. कोकोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे दत्तात्रय गायकवाड कार्यकारी अभियंता संभाजीनगर, नामदेवराव जेंगठे, नागोराव बेंदेवार, मातीखांदे, डॉ. घनशाम बिंजवे, यशवंत गुरूनुले, तुलशिराम सपाटे, प्रा. राहुल मोहुर्ले, प्रा डॉ. भाष्कर लेनगुरे, डॉ रेखा मेश्राम, डॉ हर्षा कानफाडे, डॉ अजीत खाजगीवाले, डॉ नागभिडकर इत्यादींच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन कार्यक्रम पार पडला. संचालन प्रा राहुल मोहुर्ले यांनी तर आभार प्रदर्शन प्रा पंकज बेंदेवार यांनी केले.

**महाराष्ट्र इंस्टिट्युट ऑफ फार्मसी, बेटाळा :** दि.११एप्रिल २०२६ ला महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले. ह्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र पिसे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे , रा.से. यो.अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन, प्रा.डॉ. अनुप बारसागडे, डॉ.सुहास साकरकर, प्रा.छगन डोईजड, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा. पूजा घुटके इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**काँग्रेस कार्यालय, ब्रम्हपुरी :** आधुनिक भारतातील थोर समाजसुधारक, क्रांतीकारक आणि 'स्त्री-शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती ब्रम्हपूरी येथील काँग्रेस कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष हितेंद्र राऊत, नगराध्यक्ष योगेश मिसार, वासुभाऊ सोंदरकर, गाजी पटेल, नगरसेवक राकेश पडोळे, नगरसेवक चंद्रकांत बावनकुळे, प्रमोद मोटघरे, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, अरुण अलोने, प्रा.डि.के.मेश्राम, मुन्ना रामटेके, सोमेश्वर उपासे, उपसरपंच संदीप बगमारे, मुकुंदा राऊत, सुधीर पंदीलवार यांसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**खिस्तानंद विद्यालय, ब्रम्हपुरी :** स्थानिक ख्रिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती नुकतीच साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर बिनु थॉमस उपस्थित होते. सर्वप्रथम मुख्याध्यापक बिनु थॉमस यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**माळी समाज, सायगाव :** तालुक्यातील मौजा सायगाव येथे माळी समाजाच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीचे औचित्य साधून भव्य उद्घाटनीय सोहळा व मार्गदर्शन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॉम्रेड विनोद झोडगे पाटील उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी केशव वसाके, जीवन टेंभुर्णे, माजी सरपंच अजय लाडे, उपसरपंच गुरुदेव वाघरे, अंतराम मोहूरले, मयुर शहारे, प्रदीप लुले, सुखदेव मोहूरले यांचेसह गावकरी उपस्थित होत्या.

# ठिकठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.१४एप्रिल २०२६ ला ब्रम्हपुरी व आजूबाजूच्या परिसरात विश्वरत्न, घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

**नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, ब्रम्हपुरी :** स्थानिक नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय येथे दिनांक १४ एप्रिल २०२६, मंगळवार रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक नाईक सर, उपमुख्याध्यापक नाकाडे सर, पर्यवेक्षक जीभकाटे सर यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुसारी मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन बालपांडे मॅडम यांनी केले.

**महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी :** येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्त अभिवादन



करण्यात आले.

ह्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे, रा.से. यो. अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.भूपेश भेंडारकर, प्रा.चेतन चौधरी, प्रा.प्रसंजित लांडगे, प्रा.राकेश तरारे तसेच भूपेश गोस्वामी, संजय आलेवार व इतर प्राध्यापक गण आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. जयंती निमित्त महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन, राज्य घटनेचे प्रास्ताविक वाचन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**नगर परिषद कार्यालय, ब्रम्हपुरी :** दि. १४ एप्रिल २०२६ ला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती नगर परिषद ब्रम्हपुरी कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडली. ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांचे प्रमुख उपस्थितीत नगर परिषद प्रांगणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करून जयंतीच्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. त्यानंतर रयतेचे राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वरूढ पुतळयास तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पुतळयास आमदार विजय वडेट्टीवार, नगर परिषद अध्यक्ष योगेश मिसार यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर नगर परिषद सभागृहात आमदार विजय वडेट्टीवार, नगराध्यक्ष योगेश मिसार, उपाध्यक्ष व सर्व समिती सभापती व सदस्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

# जगाला फक्त तथागतांचे विचारच वाचवू शकतात

## - आम. विजय वडेट्टीवार

ब्रम्हपुरी/का.प्र.

तथागत गौतम बुद्ध यांचे विचार सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजले. त्यांनी




बुद्धांच्या समतेच्या, मानवतेच्या आणि बंधुत्वाच्या शिकवणीचा सखोल अभ्यास करून तो विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे ऐतिहासिक कार्य केले. आजच्या काळात जगभर अस्थिरता, संघर्ष, जातीय तेढ आणि विषमता वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत मानवतेचा मार्ग दाखवणारे तथागत बुद्धांचे विचारच जगाला वाचवू शकतात, असे बहुमोल विचार विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते,आमदार वडेट्टीवार यांनी मांडले.

ब्रम्हपुरी तालुक्यातील रूई येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ देवेश कांबळे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, भंतेजी राहुल बोधी, भंतेजी आनंद, भंतेजी सारी पुत्र, भंतेजी मोगलाराम, उत्तम बनकर, अण्णा ठाकरे, देवचंद ठाकरे, जयकुमार मेश्राम, अनिल थूल, ॲड दिनेश लोखंडे, ज्ञानेश्वर लोखंडे, अशोक मेश्राम यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम बनकर यांनी तर सूत्रसंचालन प्यारेलाल बनकर यांनी केले.

# संस्कारमय पुस्तके व्यक्तिमत्त्व घडवितात

## - जगदिश मेहर

ब्रम्हपुरी/का.प्र.

विद्यार्थी जीवनात अभ्यासासोबत वाचन महत्वाचे असून, जर संस्कारमय गोष्टी व प्रेरणादायी पुस्तके वाचलीत तर नक्कीच व्यक्तिमत्व विकास होतो, असे प्रतिपादन जगदीश मेहेर यांनी केले.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माल येथे त्यांचा वाढदिवसानिमित्य, विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली. त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विजय कुंभारे, अशोक नागोसे, रतीराम बोकडे, शेखर चौधरी, नीलिमा यावलकर व शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. शाळेत विविध सहशालेय उपक्रम साजरे होतात. त्यापैकी वाढदिवस साजरे करणे या उपक्रम अंतर्गत वर्ग आठवा यांनी हा उपक्रम आयोजित केले होता. कार्यक्रमाचे संचलन दिप्ती शेंद्रे हिने तर आभार प्रदर्शन ईशान तुपट याने केले.

### ... QUOTES ...

"Success is not the key to happiness. Happiness is the key to success. If you love what you are doing, you will be successful."
- Albert Schweitzer

### चारोळी

वाटले तुझ्या ओठांना
घ्यावे ओठांनी चुंबुन...
तूत विचार बदलला,
तुझे वाहते नाक बघुन...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# भाजपच्या वतीने हळदा, आवळगाव येथील पोलीस दलात निवड झालेल्या मुलींचा सत्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील हळदा या गावातील कु. प्राची श्रीराम नरुले, कु. योगिता दादाजी बावने व आवळगाव येथील कु. शिवानी गुरनुले यांनी मोठी कामगिरी करत यशाचा नवा इतिहास रचला आहे. या तिघींची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांनी भाजपा पदाधिकाऱ्यांसह त्यांच्या हळदा येथील निवासस्थानी भेट देऊन दोन्ही यशस्वी मुलींचा व आवळगाव येथील कु. शिवानी गुरनुले यांच्या परिवाराचा सत्कार करत अभिनंदन केले. यावेळी त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधत मुलींच्या मेहनतीचे कौतुक केले.

या प्रसंगी हळदा येथे श्रीरामजी नरुले, दादाजी बावणे, भाजपा जिल्हा सचिव साकेतजी भानारकर, भाजपा तालुका सचिव अभयजी कुथे, भाजपा नेते विलासजी डोंबळे, शक्तिकेंद्र प्रमुख विनोदभाऊ नखाते, भाजपा हळदा अध्यक्ष मुखरूजी चापले, ग्रा. प सदस्य कालिदास इटणकर, ग्रा. प सदस्य बंडूभाऊ लोणारे, शंकरजी आष्टेकर, सोशल मीडिया तालुका संयोजक धीरजजी पाल, सचिन ढोरे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ने.हि. महाविद्यालयात महात्मा फुले जयंती

## प्र.कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांची उपस्थिती




ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात सत्यशोधक चळवळीचे अग्रणी, सामाजिक क्रांतीचे जनक, स्त्री शिक्षणाचे प्रणते महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी गोंडवाना विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ.श्रीराम कावळेंची प्रामुख्याने उपस्थिती होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर व डॉ श्रीराम कावळेंनी प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळेस घोषणा देऊन महात्मा जोतीराव फुलेंना पुष्प वाहून सर्वांनी अभिवादन केले. कार्यक्रमाला डॉ धनराज खानोरकर, डॉ सुनिल चौधरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ योगेश ठावरी, डॉ कुलजित शर्मा, डॉ राजू आदे, प्रा जयेश हजारे, प्रा धिरज आतला, प्रा रुपेश वाकोडीकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

संचालन डॉ युवराज मेश्राम तर आभार प्रदर्शन डॉ धनराज खानोरकरांनी केले. यशस्वीतेसाठी समितीचे पदाधिकारी व जगदिश गुरनुरेंनी मोलाचे सहकार्य केले.

# स्वच्छता मोहिम व विकास कामांचा आढावा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी समता कॉलनी (वार्ड क्र. २) येथे नगरपरिषद ब्रह्मपुरीच्या वतीने विशेष ‘स्वच्छता मोहीम’ राबविण्यात आली. या मोहिमेप्रसंगी प्रभागाचे नगरसेवक प्रकाश खोब्रागडे तथा नगरपरिषद ब्रह्मपुरीच्या महिला व बालकल्याण सभापती बबीताताई आमले यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वच्छता मोहिमेदरम्यान मान्यवरांनी संपूर्ण कॉलनीचा फेरफटका मारून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि प्रलंबित कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच नगरसेवक प्रकाशभाऊ खोब्रागडे यांनी यावेळी माहिती दिली की, समता कॉलनीतील प्रलंबित रोड व नाल्यांच्या बांधकामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. या कामांची यादी नगरपरिषेकडे सादर करून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यामुळे लवकरच कॉलनीतील रस्ते व नाल्यांचा प्रश्न मार्गी लागेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

याप्रसंगी लीलाधर झलके, डॉ. बाळकृष्ण शेळके, अनंत खोकले, योगेश राऊत, ज्ञानेश्वर हटवार, सदानंद खुणे, गौतम चिकनकर, विशाल शेंडे, वसंता ठाकरे, सुकेसीनी बनसोड, गजभिये मॅडम, वनिता वैरकर, मंदाताई रोहणकर व इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर राबविलेल्या या स्वच्छता मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# धानाचे 'बोनस'...

(पान क्र. १ वरून)

कॉ विनोद झोडगे व धान खरेदी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष नानाजी तूपट यांच्या नेतृत्वात दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी तालुक्यातील शेतकरी बांधवांनि तहसीलदार मार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.


निवेदनात नमूद केल्यानुसार तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी सेवा सहकारी संस्थांच्या केंद्रांवर धान विक्री केली आहे. मात्र, केंद्रांचे उद्दिष्ट संपल्याचे कारण पुढे करून खरेदी ठप्प करण्यात आली आहे. अनेकांनी बँकांकडून पीक कर्ज घेतले होते, ज्याची परतफेड आता अशक्य झाली असून बँकांचा तगादा सुरू झाला आहे. पुढील खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हातात पैसे नसल्याने मोठा यक्षप्रश्न उभा राहिला आहे. वाढती मजुरी, खतांचे दर आणि निसर्गाची अनिश्चितता यामुळे धानाचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. केंद्र सरकारची आधारभूत किंमत (MSP) उत्पादन खर्चाच्या तुलनेत अतिशय कमी असून, जोपर्यंत शासन प्रति क्विंटल ७०० ते १००० रुपये बोनस जाहीर करत नाही, तोपर्यंत शेतकरी नफ्यात येणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे.

४-५ दिवसांत उद्दिष्ट वाढवून न दिल्यास महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा व तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. याप्रसंगी विनोद नवघडे, अमृत नखाते तसेच विविध सेवा सहकारी सोसायटी चे प्रतिनिधी म्हणून अनंता उरकुडे, संजय ठाकुर, रमेश जिभकाटे, गुलाब बालपांडे, किशोर बगमारे, समीर मिसार, विनोद काळे आणि परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.


Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध



- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)


संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# सामाजिक ऋणातून फुलले मनिषाचे...

(पान क्र. १ वरून)

हेमलता सिंहगडे, पुष्पलता पोपटे यांनी एकत्र येत मनिषाच्या लग्नासाठी आर्थिक मदत जमा केली.

नगर परिषद ब्रह्मपुरी येथील काँग्रेस नगरसेवकांनी दाखवलेल्या या दातृत्वामुळे परिसरात त्यांचे कौतुक होत आहे. गरीब आणि अनाथ मुलीच्या पाठीशी उभे राहून, समाजाप्रती असलेले आपले ऋण त्यांनी कृतीतून सिद्ध केले आहे. लोकप्रतिनिधी फक्त विकासाची कामेच करत नाहीत, तर संकटाच्या वेळी कुटुंबातील सदस्याप्रमाणे धावून येतात, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. ‘मनिषा ही मुलगी अनाथ असली तरी ती संपूर्ण शहराची कन्या आहे, या भावनेने आम्ही सर्वांनी हे छोटेसे योगदान दिले आहे. तिच्या सुखी संसारासाठी आमच्या सर्वांच्या शुभेच्छा तिच्या पाठीशी आहेत.’ अशी भावना यावेळी नगराध्यक्ष योगेश मिसार व इतर नगरसेवकांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे ‘सामाजिक ऋणाची’ एक नवीन पायंडा ब्रह्मपुरीत घातला गेला आहे.


- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964 प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315


# ब्रम्हपुरीचा पारा ४२ अंशाच्या पार...

(पान क्र. १ वरून)

आहेत. शहरातील रसवंती गृहे, ताक, लस्सी आणि लिंबू सरबत विक्रीच्या केंद्रांवर नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. तसेच, मातीच्या माठांच्या मागणीतही मोठी वाढ झाली आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी नागरिक टोपी, स्कार्फ आणि छत्रीचा आधार घेताना दिसत आहेत.

वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना विशेषतः वृद्ध आणि बालकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत कामाशिवाय बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. पुरेसे पाणी प्यावे, हलके सुती कपडे वापरावे आणि प्रकृती बिघडल्यास तात्काळ उपजिल्हा रुग्णालयात संपर्क साधावा, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

❁❁❁❁❁❁❁


बुधवार बंद - दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404